# डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला

## कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ

# शेतकरी शास्त्रज्ञ मंच अहवाल




*सादर*

संचालक विस्तार शिक्षण संचलनालय,

डॉ. पंदेकृवि, अकोला

# 'शेतकरी शास्त्रज्ञ मंच'

सुमारे १०,००० वर्षांपूर्वी मानवाने भटकंतीचे जीवन सोडून शेतीचा शोध लावला. दगडी अवजारांपासून सुरू झालेला शेतीचा प्रवास पुढे लाकडी नांगर, तांबे व लोखंडी अवजारे यांमधून विकसित होत आज ट्रॅक्टर, ठिबक सिंचन, ड्रोन आणि डिजिटल तंत्रज्ञानापर्यंत पोहोचला आहे. शेतीच्या विकासाबरोबरच सिंचन व्यवस्थेचीही सुरुवात झाली. नद्यांच्या खोऱ्यांमध्ये कालवे, विहिरी आणि इतर जलस्रोतांच्या माध्यमातून पिकांना पाणी देण्याच्या पद्धती विकसित झाल्या. शेतीसोबतच मानवाने गाई, बैल, शेळ्या आणि मेंढ्यांचे पालन सुरू केले. त्यामुळे कायमस्वरूपी वस्ती, ग्रामसंस्कृती आणि सभ्यतेचा उदय झाला.

कालांतराने इंग्रजांनी भारतात व्यापाराबरोबरच राज्यकारभार अधिक कार्यक्षमपणे चालविण्यासाठी विविध प्रशासकीय विभागांची स्थापना केली. त्यामध्ये कृषी विभागाचाही समावेश होता. स्वातंत्र्यानंतर कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेतून केंद्र व राज्य शासनांनी कृषी विभाग अधिक सक्षम केला. राष्ट्रीय व राज्य स्तरावर कृषी संशोधनाला चालना मिळाली आणि विविध संशोधन संस्था तसेच कृषी विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी होऊ लागला.

लोकसंख्या वाढत गेल्यामुळे अन्नधान्याची गरजही वाढत गेली. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी शास्त्रज्ञांनी विविध संशोधनाधारित उपाय विकसित केले. १९६० च्या दशकात भारतात डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या नेतृत्वाखाली हरितक्रांती घडून आली. संकरित बियाणे, रासायनिक खते आणि कीटकनाशकांच्या वापरामुळे अन्नधान्याच्या उत्पादनात अभूतपूर्व वाढ झाली.

त्यानंतर शेतीचे यांत्रिकीकरण वेगाने वाढले. नांगरणीसाठी ट्रॅक्टर, मळणीसाठी थ्रेशर आणि कापणीसाठी कंबाईन हार्वेस्टर यांसारख्या आधुनिक यंत्रांचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. जलसंधारण व पाणी व्यवस्थापनाच्या दृष्टीने पारंपरिक पद्धतींऐवजी ठिबक व तुषार सिंचनाचा अवलंब वाढला. कृषी उत्पादनासोबतच प्रक्रिया उद्योगांनाही चालना मिळाली. आजच्या काळात स्मार्ट शेतीच्या संकल्पनेत ड्रोन, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), रोबोटिक्स, इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) आणि विविध सेन्सर्सच्या साहाय्याने जमिनीची सुपीकता, हवामानाचा अंदाज व पिकांची स्थिती यांचे अचूक विश्लेषण करून आधुनिक शेती केली जात आहे.

विकसित झालेले संशोधन शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचविण्यासाठी कृषी विस्तार (Agricultural Extension) ही महत्त्वाची शाखा विकसित झाली. या शाखेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे वैज्ञानिक संशोधन, नवीन तंत्रज्ञान आणि आधुनिक शेती पद्धती प्रयोगशाळेतून थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे. यासाठी वैयक्तिक संपर्क पद्धती (Individual Methods), गट संपर्क पद्धती (Group Methods), क्षेत्रीय प्रात्यक्षिके (Field Demonstrations), प्रशिक्षण वर्ग, चर्चासत्रे, शेतकरी मेळावे, क्षेत्रभेटी (Field Tours), तसेच आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे, मोबाईल ॲप्स आणि सोशल मीडियासारख्या प्रसारमाध्यमांचा प्रभावी वापर केला जातो.

कृषी तंत्रज्ञानाचा अधिक व्यापक प्रसार करण्यासाठी शासनाने विविध योजना राबवल्या. त्यामध्ये कृषी विज्ञान केंद्रांची स्थापना, शेतकरी प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, शेतभेटी आणि तंत्रज्ञान प्रसार कार्यक्रमांचा समावेश आहे.

तंत्रज्ञानाचा प्रभावी प्रसार करण्यासाठी 'यशस्वी शेतकरी मॉडेल' (Peer-to-Peer Learning) ही संकल्पना अत्यंत परिणामकारक ठरली आहे. आपल्या परिसरातील यशस्वी व प्रयोगशील शेतकऱ्यांच्या अनुभवातून इतर शेतकरी अधिक सहजपणे प्रेरित होतात. त्यांच्या शेतावर आयोजित केलेली प्रात्यक्षिके नवीन तंत्रज्ञानाविषयी विश्वास निर्माण करतात. प्रत्यक्ष यश पाहून इतर शेतकरी ते तंत्रज्ञान आत्मसात करण्यास अधिक उत्सुक होतात. या 'Demonstration Effect' मुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढतो, नवतंत्रज्ञानाचा स्वीकार वेगाने होतो, उत्पादन खर्च कमी होतो आणि उत्पन्नात वाढ होते.

याच संकल्पनेला मूर्त स्वरूप देत डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचे सन्माननीय कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या दूरदृष्टीतून आणि सन्माननीय संचालक (विस्तार शिक्षण) डॉ. धनराज उंदिरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'शेतकरी शास्त्रज्ञ मंच' या अभिनव उपक्रमाची स्थापना करण्यात आली. या उपक्रमांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात शेती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्यांचा मंच स्थापन करण्यात येतो. त्या मंचातून एका प्रगतशील शेतकऱ्याची अध्यक्ष म्हणून निवड केली जाते. त्यानंतर विविध गावांमध्ये व शेतांवर बैठका, चर्चासत्रे आणि प्रात्यक्षिकांचे आयोजन केले जाते. या व्यासपीठावर यशस्वी शेतकरी स्वतःचे अनुभव, नवकल्पना आणि यशोगाथा इतर शेतकऱ्यांसमोर मांडतात. त्यांच्या अनुभवातून प्रेरणा घेऊन इतर शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करतात आणि शेतीमध्ये शाश्वत प्रगतीचा मार्ग स्वीकारतात.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला अंतर्गत राबविण्यात येणारा 'शेतकरी शास्त्रज्ञ मंच' हा शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यातील दुवा निर्माण करणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. या मंचाचा मुख्य उद्देश आधुनिक शेती तंत्रज्ञान, संशोधनातील नवकल्पना आणि शास्त्रशुद्ध शेती पद्धतींची माहिती थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे तसेच शास्त्रज्ञ आणि शेतकरी यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करणे हा आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील प्रगतशील, वैशिष्ट्यपूर्ण शेती करणारे, शेती संलग्न व्यवसायात यशस्वी ठरलेले तसेच इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरू शकतील अशा शेतकऱ्यांना एकत्र आणून त्यांचा मंच तयार केला जातो. या मंचाच्या सभा विविध गावांमध्ये आयोजित करून प्रगतशील शेतकऱ्यांचे अनुभव, नवनवीन प्रयोग आणि यशोगाथा इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविल्या जातात. त्यामुळे इतर शेतकऱ्यांना प्रेरणा मिळून शेतीमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत होते.

हा उपक्रम विद्यापीठाशी संलग्नित घटक महाविद्यालये, कृषी संशोधन केंद्रे आणि कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ यांसह सर्व केंद्रांमार्फत राबविण्यात येतो. साधारणपणे दर महिन्याला या सभांचे आयोजन करण्यात येते. सभेच्या पूर्वार्धात तज्ज्ञ शास्त्रज्ञांकडून पूर्वनियोजित विषयांवर मार्गदर्शन केले जाते, मंचाच्या शेतकऱ्यांचे अनुभव इतर शेतकऱ्यापर्यंत पोहोचवणे ज्या मधून प्रेरणा भेटून इतर शेतकरी शेतीमध्ये सुधारणा घडवून आणू शकतील. तर उत्तरार्धात शेतभेट, प्रात्यक्षिके, प्रश्नोत्तरे आणि मुक्त चर्चेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण केले जाते. विशेष म्हणजे, पुढील सभेचा विषय स्वतः शेतकरी निश्चित करतात आणि त्यानुसार संबंधित विषयातील तज्ज्ञांना आमंत्रित केले जाते.

**शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे प्रमुख फायदे :**

- मंचाच्या शेतकऱ्यांच्या सभांचे वेगवेगळया गावात आयोजन करून त्या शेतकऱ्यांचे अनुभव इतर शेतकऱ्यापर्यंत पोहोचवणे ज्या मधून प्रेरणा भेटून इतर शेतकरी शेतीमध्ये सुधारणा घडवून आणू शकतात.
- हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक फेरबदल व नवीन वाणांची माहिती मिळते.
- कीड व रोग व्यवस्थापनाबाबत शास्त्रशुद्ध मार्गदर्शन मिळते.
- खत व्यवस्थापन आणि फवारणी तंत्रज्ञानाची योग्य माहिती प्राप्त होते.
- प्रगतशील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीतील नवनवीन प्रयोगांची देवाणघेवाण करता येते.
- शेतकरी आणि शास्त्रज्ञ यांच्यात थेट संवाद घडून येऊन स्थानिक समस्यांवर व्यवहार्य उपाय सुचविले जातात.
- शेतीतील नवतंत्रज्ञानाचा प्रसार होऊन शेतकऱ्यांचे ज्ञान, कौशल्य आणि उत्पन्नवाढीस चालना मिळते.

अशा प्रकारे, 'शेतकरी शास्त्रज्ञ मंच' हा शेतकरी, शास्त्रज्ञ आणि विस्तार यंत्रणा यांच्यातील प्रभावी समन्वय साधून शाश्वत आणि प्रगत शेती विकासासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारा उपक्रम आहे.

**कृषी विज्ञान केंद्र 'शेतकरी शास्त्रज्ञ मंच'**

वरील शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे उद्दिष्ट लक्षात घेता कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ येथे १७ जानेवारी 2023 **'शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची** स्थापना करण्यात आली यामध्ये जिल्ह्यातील उत्कृष्ट शेती करणाऱ्या 35 शेतकऱ्यांची निवड करण्यात आली त्यांची यादी खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | शेतकऱ्यांची नावे | पत्ता | दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. अशोकराव शिवराम वानखेडे | मु. पो. सुकळी ता. उमरखेड जि. यवतमाळ | ९४०३४९३१०० |
| २ | श्री. निलेश दामोधर शिंदे | मु. पो. बोरगाव पुंजी ता. आर्णि जि. यवतमाळ | ९४२३६६४८४४ |
| ३ | श्री. विकास महादेव गर्जे | मु. पो. मादनी ता. बाभुळगाव जि. यवतमाळ | ८२७५८१०१११ |
| ४ | श्री. विकास मोहनराव क्षिरसागर | मु. पो. कोपामांडवी ता. पांढरकवडा जि. यवतमाळ | ८६६८४१४१५४ |
| ५ | श्री. जगदीश हरिदास चव्हाण | मु. पो. गाझीपूर ता. दारव्हा जि. यवतमाळ | ९७६३३८१७७७ |
| ६ | श्री. कृष्णराव दशेट्टीवार | मु. पो. खैरगाव (देशमुख) ता. पांढरकवडा जि. यवतमाळ | ९६२२१२६१६१ |
| ७ | श्री. माधवराव लक्ष्मणराव राऊत | मु. पो. अंबोडा ता. आर्णि जि. यवतमाळ | ९७६४०७६१५२ |
| ८ | श्री. सुमित प्रभाकर राऊत | मु. पो. राळेगाव ता. राळेगाव जि. यवतमाळ | ८६२५८५७२५८ |
| ९ | श्री. शुभम दिवाकर दिघाडे | मु. पो. वाघापूर ता. जि. यवतमाळ | ८८८८९९९६२२ |
| १० | श्री. सुनिल विठ्ठल घावडे | मु. पो. ब्राम्हणवाडा ता. नेर जि. यवतमाळ | ९२८४३१२३४७ |
| ११ | श्री. प्रभाकर वि. ठाकरे | मु. पो. शिवणी ता. जि. यवतमाळ | ७७५६०६९८८७ |
| १२ | श्री. गजानन आत्राम | मु. पो.एकलारा ता. राळेगाव जि. यवतमाळ | ७५०७०७३३७४ |
| १३ | श्री. मनिष आनंदराव चरडे | मु. पो. हिरापूर ता. कळंब जि. यवतमाळ | ७४४७५६०१९५ |
| १४ | श्री. अनंता शेषराव वेखंडे | मु. पो. कापरा ता. जि. यवतमाळ | ९४२३२८५३५६ |
| १५ | श्री. आशिष बबनराव गायकी | मु. पो. कापरा ता. जि. यवतमाळ | ९७६३१७५१०३ |
| १६ | श्री. साखरूजी नवसुजी मोरे | मु. पो. खानगाव तां. जि. यवतमाळ | ९६०४८५९६५५ |
| १७ | श्री. आनंद दिनकर गोविंदवार | मु. पो. उमरखेड ता. उमरखेड जि. यवतमाळ | ९४२३६५३९९८ |
| १८ | श्री. बाबाराव हरिभाऊ कपीले | मु. पो. यवतमाळ ता. जि. यवतमाळ | ९९२३५१००६४ |
| १९ | श्री. विजय पाटील | मु. पो. मेटिखेडा ता. कळंब जि. यवतमाळ | ९९२३१८२३५३ |
| २० | श्री. मनिष जाधव | मु. पो. वाघद (इ) ता. महागांव जि. यवतमाळ | ९४२३६५२५४६ |
| २१ | श्री. संदीप ज्ञानेश्वर कोठेकर | मु. पो. उंदरनी ता. घाटंजी जि. यवतमाळ | ७६२०४६९१९२ |
| २२ | श्री. अरविंद ठोकळ | मु. पो. चानी कामठवाडा ता. दारव्हा जि. यवतमाळ | ७५८८५९१३१५ |
| २३ | श्री. निलेश टाके | मु. पो. ता. जि. यवतमाळ | ८२७५०३६३६९ |
| २४ | श्री. प्रविण नारायण देठे | मु. पो. सुकळी ता. आर्णि जि. यवतमाळ | ९५४५६२८७६८ |
| २५ | श्री. हरिश काळे | मु. पो. रिधोरा ता. राळेगाव जि. यवतमाळ | ७५०७५१५२७५ |
| २६ | श्री. संदिप हंडे | मु. पो. वाढोणाबाजार ता. राळेगांव जि. यवतमाळ | ८३२९३६८३९६ |
| २७ | श्री. स्वप्नील सुभाषराव ठाकरे | मु. पो. ता. बाभुळगांव जि. यवतमाळ | ९६८९७६८२०२ |
| २८ | श्री. सचिन गजानन रंगे | मु. पो. कापरा ता. जि. यवतमाळ | ९७३०५९८०८५ |
| २९ | श्री. निखिल भानुदास राऊत | मु. पो. यावली ता. बाभुळगांव जि. यवतमाळ | ९३०९७२८११४ |
| ३० | श्री. सुगनचंद वामनराव राठोड | मु. पो. वाई पारस ता. नेर जि. यवतमाळ | ९४०५३९२१८९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | श्री. बंडू कोंडूजी मोहूर्ले | मु. पो. चिखलगाव ता. वणी जि. यवतमाळ | ९६८९२६१६८७ |
| ३२ | श्री. हनुमंतराव देशमुख | मु. पो. ता. नेर जि. यवतमाळ | ७५८८१८८८६९ |
| ३३ | श्री. रामेश्वर परसराम जाधव | मु. पो. टाकळी सलामी ता. नेर जि. यवतमाळ | ९५५२७५१६५५ |
| ३४ | श्री. प्यारेनाथ काशीनाथ जगताप | मु. पो. वाढोणा ता. पांढरकवडा जि. यवतमाळ | ९७६६९९५५११ |
| ३५ | श्री. देविदास शामराव डंभारे | मु. पो. कवठा जि. यवतमाळ | ९४२३६५३३०९ |

**'शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची सभा एकूण- ३०**

| अनु. क्र | दिनांक | ठिकाण | एकूण उप स्थिती | उपस्थिती मान्यवर | चर्चा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १७ जानेवारी २०२३ | कृविके यवतमाळ | 44 | नवनाथ कोळपकर DSAO & कृविके शास्त्रज्ञ | अध्यक्षपदी निवडी करिता सर्वानुमते 'शेतकरी शास्त्रज्ञ मंच' चे अध्यक्ष म्हणून श्री. अशोकराव वानखडे, सुकळी- एकात्मिक शेती व्यवस्थापन, महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त तर उपाध्यक्षपदी श्री. जगदीशभाऊ चव्हाण, गाझीपुर- सन २०१९ उद्यान पंडित महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त यांची निवड करण्यात आली<br>शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या द्वारे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी मंचाचे शेतकऱ्यांच्या शेतकरी सभेचे आयोजन करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. परंतु काही तांत्रिक अडचणी मुळे सदरील कार्यक्रम प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी आयोजित न झाल्यास सर्वानुमते कार्यक्रमाची तारीख निश्चित करण्यात येईल. |
| २ | ०८ फेब्रुवारी २०२३ | गाझीपुर ता. दारव्हा | १२३ | श्री. अमोल येडगे, जिल्हाधिकारी | आधुनिक शेतीमध्ये यांत्रिकीकरणाचा वापर करावा तसेच विद्यापीठाचे शिफारशीत तंत्रज्ञानाचा शेतकरी शास्त्रज्ञ मंच द्वारे प्रसार आणि प्रचार जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यापर्यंत पोहचविण्याचे काम करावे.मा. श्री. जगदीशभाऊ चव्हाण, गाझीपुर- सन २०१९ उद्यान पंडित महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त,मौजे गाजीपूर ता. दारव्हा यांच्या प्रक्षेत्रावर लागवड केलेल्या विविध पिकास भेटी देवून, त्याबाबत जनजागृती करण्यात आली.ड्रोन तंत्रज्ञानाचा शेती मध्ये वापर या विषयी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना प्रत्येक्षिक स्वरुपात माहिती द्यावी. |
| ३ | १० मार्च २०२३ | रिधोरा ता. राळेगाव | ७२ | श्री. अमोल जोशी SDAO, राळेगाव | शेतीच्या कच्च्या मालाचे प्रक्रिया करून उद्योग उभारावे.<br>उपरोक्त शेतीमध्ये नाविण्यापूर्व उपक्रम करत असलेल्या प्रगतशील शेतकरी बांधवांच्या पाठीमागे सलंग्न विभागाने सक्षम उभे राहावे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | २८ मे २०२३ | कृविके यवतमाळ | ५६ | श्री. संतोष डाबरे, PD ATMA & कृविके शास्त्रज्ञ | कृषी विज्ञान केंद्राद्वारे खरीप हंगामामध्ये 'शेतकरी शास्त्रज्ञ मंच' सभेच्या माध्येमातून बी बी एफ पेरणी यंत्राचे प्रात्येक्षिक द्यावे.शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या सदस्यांनी आपल्याकडे उपलब्ध असलेले विकसित बियाणांचे वाण इतर शेतकरी बांधवांना पुरविण्याचे नियोजन करावे.<br>2. प्रक्रिया उद्योगाकरिता कच्च्या मालाचा पुरवठा शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या सदस्यांनी करावा व प्रक्रिया उद्योग उभारनिकरिता भरीव कामगिरी करावी. |
| ५ | १० जुलै २०२३ | एकलारा ता. राळेगाव | ३९ | श्री. संजय मेहत्रे, Assistant Commissioner, Fishery | प्रगतशील शेतकरी (मत्स्यव्यवसाय) तथा शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य मा. श्री. गजुभाऊ आत्राम, एकलारा ता. राळेगाव यांनी संलग्न विभागांनी नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्याकरिता योजना मार्फत भरीव अनुदानाची मदत करावी.मा. अजय मेश्रे, सहायक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, यवतमाळ यांनी राष्ट्रीय मत्स्यदिवसाचे महत्व सांगून, मत्स्य विभाग राबवीत असलेल्या शासकीय योजनांकरिता वेळोवेळी कार्यालयास संपर्क करावा. |
| ६ | ११ ऑगस्ट २०२३ | मनकोपरा ता. दारव्हा | ५३ | श्री. संतोष डाबरे, PD ATMA & कृविके शास्त्रज्ञ | शेतीकरी बांधवांनी एकत्र येवून शेतीचे नियोजन आणि व्यवस्थापन करण्याकरिता शेतकरी उत्पादक गट किंवा कंपनी स्थापन करण्यासाठी प्रयत्न करावा.<br>स्वयंरोजगार निर्मितीकरिता व पिकाचे मुल्यसंवर्धनाचे प्रकल्प उभारणी करिता शासकीय योजनांचा लाभ शेतकरी उत्पादक गट किंवा कंपनी मार्फत घ्यावा.<br>शेतीपूरक रेशीम उद्योगाविषयी कार्यालयाशी शेतकरी बांधवांनी संपर्क साधावा. |
| ७ | १९ ऑक्टोबर २०२३ | कृविके यवतमाळ | ६२ | श्री. कल्याण पाटील DSAO member & कृविके शास्त्रज्ञ | रब्बी हंगामामध्ये रुंद वरंबा सरी लागवड तंत्रज्ञानाचा वापर जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी व मंचाच्या सदस्यांनी अवलंबावा<br>रब्बी हंगाम पिकाच्या लागवडी विषयी चर्चा सत्राचे आयोजन गाव स्तरावर करावे<br>कीड व रोग व्यवस्थापनावर अवाजीव खर्च टाळून शिफारशीत तंत्रज्ञान विषयी शेतकरी बांधवांनी वेळोवेळी कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञशी संपर्कात राहावे. |
| ८ | ०८ डिसेंबर २०२३ | कृविके यवतमाळ | २८ | श्री. प्रमोद लहाडे DSAO & कृविके शास्त्रज्ञ | माती परीक्षण आधारित खत व्यवस्थापन करण्या करिता जनजागृती करावी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | विषय ठरवून शेतकरी शास्त्रज्ञ मंच सभेचे आयोजन करून शेतकरी बांधवांच्या शंकांचे निरसन करावे<br>माती नमुना घेण्यासाठी गावस्तरावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करावे. |
| ९ | १० जानेवारी २०२४ | खैरगाव देशमुख ता. केळापूर | १०३ | श्री. दादा लाड & कृविके शास्त्रज्ञ | कापूस पिकाच्या गुलाबी बोंड अळी व्यवस्थापन करिता वेळोवेळी तांत्रिक मार्गदर्शन करावे.<br>कापूस पिकाच्या कमी खर्चिक तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन करावे. |
| १० | १९ मार्च २०२४ | लासिना | ६३ | श्री. संतोष डाबरे, PD ATMA & कृविके शास्त्रज्ञ | सेंद्रिय शेती व नैसर्गिक शेती विषयी वेळोवेळी जिल्ह्यामध्ये जनजागृती करावी.<br>खतावरील अवाजवी खर्च कमी करण्याकरिता प्रत्येक शेतकरी बांधवांनी गांडूळ खत निर्मिती करण्याच्या संकल्प करावा.<br>कीड व रोग व्यवस्थापना करिता कमी खर्चिक जैविक औषध निर्मिती करिता कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ यांच्याशी संपर्क साधावा. |
| ११ | ०८ एप्रिल २०२४ | गोधनी ता. यवतमाळ | ७३ | श्री. प्रमोद लहाडे DSAO . श्री. संतोष डाबरे, PD ATMA & कृविके शास्त्रज्ञ | शेतीमध्ये बांबू लागवड तंत्रज्ञान जनजागृती करिता मार्गदर्शनाचे आयोजन करावे<br>शेतीला पूरक व्यवसाय करिता उद्योगाची निवड करून त्या विषयी मार्गदर्शक उपलब्ध करून मार्गदर्शन मिळावे. |
| १२ | ३० मे २०२४ | कृविके यवतमाळ | ७९ | श्री. प्रमोद लहाडे DSAO . श्री. संतोष डाबरे, PD ATMA & कृविके शास्त्रज्ञ | बांबू लागवड तंत्रज्ञान |
| १३ | १४ जून २०२४ | कृविके यवतमाळ | 34 | कृविके शास्त्रज्ञ | पिक स्पर्धेचे महत्व व निविष्ठा वाटप<br>खरिफ हंगामातील प्रमुख पिकाचे नियोजन |
| १४ | २७ ऑगस्ट २०२४ | मादनी ता. यवतमाळ | 42 | श्री. प्रमोद लहाडे DSAO . श्री. संतोष डाबरे, PD ATMA & कृविके शास्त्रज्ञ | भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान |
| १५ | २२ सप्टेंबर २०२४ | Dr. PDKV Akola | 32 | कृविके शास्त्रज्ञ | अभ्यास दौरा - शिवार फेरी सहभाग |
| १६ | २२ ऑक्टोबर २०२४ | कृविके यवतमाळ | ६२ | श्री. संतोष डाबरे, PD ATMA & कृविके शास्त्रज्ञ | नैसर्गिक शेतीचे महत्व |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १७ | ०५ डिसेंबर २०२४ | कृविके यवतमाळ | १४२ | श्री. संतोष डाबरे, PD ATMA & कृविके शास्त्रज्ञ | जागतिक मृदा दिवस<br>रब्बी पिकातील व्यवस्थापन |
| १८ | २९ डिसेंबर २०२४ | Dr. PDKV, Akola | २६ | कृविके शास्त्रज्ञ | अभ्यास दौरा – कृषी प्रदर्शनी सहभाग |
| १९ | २९ जानेवारी २०२५ | कृविके यवतमाळ | ५० | श्री. संतोष डाबरे, PD ATMA & कृविके शास्त्रज्ञ | भाजीपाला उत्पादन तंत्रज्ञान |
| २० | २४ फेब्रुवारी २०२५ | कृविके यवतमाळ | १७३ | Hon'ble Minister Ashok Uike | PM किसान सन्मान निधी व शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे प्रदर्शन |
| २१ | १० मार्च २०२५ | समता मैदान, यवतमाळ | १८ | श्री. संतोष डाबरे, PD ATMA & कृविके शास्त्रज्ञ | कृषी महोस्तव यवतमाळ |
| २२ | ०२ ऑगस्ट २०२५ | कृविके यवतमाळ | १६१ | Hon'ble Minister Sanjay Rathod | PM किसान सन्मान निधी व शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे प्रदर्शन |
| २३ | २० सप्टेंबर २०२५ | Dr. PDKV, Akola | २६ | कृविके शास्त्रज्ञ | अभ्यास दौरा – शिवार फेरी सहभाग |
| २४ | १९ नोव्हेंबर २०२५ | कृविके यवतमाळ | १४१ | श्री. संतोष डाबरे, PD ATMA & कृविके शास्त्रज्ञ | PM किसान सन्मान निधी व शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे प्रदर्शन<br>रब्बी पिकातील व्यवस्थापन |
| २५ | २४ नोव्हेंबर २०२५ | नागपुर | १५ | मा. ना. श्री. नितीन गडकरी | Agrovision प्रदर्शन नागपूर |
| २६ | २३ डिसेंबर २०२५ | कृविके यवतमाळ | ११९ | कृविके शास्त्रज्ञ | विकसीत भारत G RAM G योजनेचा शुभारंभ |
| २७ | २८ डिसेंबर २०२५ | कृविके यवतमाळ | १६ | कृविके शास्त्रज्ञ | अभ्यास दौरा – कृषी प्रदर्शनी सहभाग |
| २८ | १३ जानेवारी २०२६ | मानकोपरा | ३६ | कृविके शास्त्रज्ञ | Drone तंत्रज्ञान Farmer Producer Company |
| २९ | ०८ मार्च २०२६ | कृविके यवतमाळ | २० | मा. कुलगुरू डॉ. पंदेकृवी अकोला | शेतकरी शास्त्रज्ञ मंच च्या सदस्यांशी चर्चा |
| ३० | ०२ जून २०२६ | जवळा ता, आर्णी | १५० | श्री. मनोजकुमार ढगे, DSAO & कृविके शास्त्रज्ञ | दुग्ध व्यवसाय |

**शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचा झालेला आर्थिक सामाजिक प्रभाव**

1. शेतकरी शास्त्रज्ञ मंचामुळे सदस्यांच्या मध्ये देवाणघेवाण सुरू झाली मंचाचे सदस्य एकत्रितपणे शेतीचे प्रयोग पाहण्यासाठी जायला लागले त्या ठिकाणी त्यांच्यामध्ये चर्चा घडत असे तसेच मंचाच्या सदस्यांचे जे शेतीमधील वेगळेपण होते. हे वेगळेपण प्रत्येक सभेमध्ये इतर शेतकऱ्यांनी ऐकले व त्यांच्या शेतात त्याचे अनुकरण केले त्यामुळे मंचाच्या सदस्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात मोठा बदल दिसून आला.
2. **श्री. निलेश टाके** यांनी आपल्या शेतावर अत्यंत कमी खर्चात गांडूळ खत निर्मिती प्रकल्पाची उभारणी करून सेंद्रिय शेतीचा एक आदर्श निर्माण केला. त्यांनी शेतीतील उपलब्ध शेणखत, पीक अवशेष आणि इतर सेंद्रिय पदार्थांचा वापर करून दर्जेदार गांडूळ खत तयार करण्यास सुरुवात केली. या प्रकल्पामुळे रासायनिक खतांवरील खर्च कमी झाला, जमिनीची सुपीकता वाढली आणि पिकांच्या उत्पादनातही सकारात्मक बदल दिसून आला. कृषी विज्ञान मंचाच्या सदस्यांनी त्यांच्या शेताला भेट देऊन गांडूळ खत निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष पाहिली. श्री. टाके यांनी गांडूळ खत तयार करण्याची पद्धत, गांडुळांची निवड, बेडची उभारणी, ओलावा व्यवस्थापन, खत संकलन आणि त्याचा पिकांमध्ये प्रभावी वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रात्यक्षिकाचा परिणाम म्हणून मंचातील अनेक सदस्यांनी आपल्या शेतावर लहान प्रमाणात गांडूळ खत युनिटची उभारणी केली. पुढे त्यांच्या मार्गदर्शनामुळे जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनीही गांडूळ खत निर्मिती प्रकल्प सुरू केले. त्यामुळे सेंद्रिय खतांचा वापर वाढला, उत्पादन खर्चात बचत झाली, मातीचे आरोग्य सुधारले आणि शाश्वत शेतीला चालना मिळाली. आज श्री. निलेश टाके यांचा गांडूळ खत प्रकल्प हा जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी मॉडेल ठरला असून, अनेक शेतकरी त्यांच्या शेताला भेट देऊन प्रशिक्षण घेत आहेत आणि सेंद्रिय शेतीचा स्वीकार करत आहेत. **श्री. निलेश टाके यांनी २० टन गांडूळ खत दला निर्यात केला.**



3. **हरीश भाऊ काळे** यांनी आपल्या शेतात **एकात्मिक शेती पद्धतीचा** प्रभावी अवलंब करून शेतीला नवे आर्थिक बळ दिले आहे. पारंपरिक शेतीसोबत विविध पूरक उपक्रमांची सांगड घालत त्यांनी उत्पन्नाचे अनेक स्रोत निर्माण केले आहेत. शेतात उत्पादित होणाऱ्या उसाचे मूल्यवर्धन करून त्यांनी **उसापासून कुल्फी निर्मिती** हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. त्यामुळे कच्चा माल थेट विकण्याऐवजी प्रक्रिया करून अधिक नफा मिळविण्याचा मार्ग त्यांनी स्वीकारला आहे. याचबरोबर शेताच्या बांधावर उभारलेल्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून सेंद्रिय निविष्ठा निर्मिती करून स्वतःच्या शेतीतील उत्पादन खर्च कमी केला असून इतर शेतकऱ्यांनाही दर्जेदार सेंद्रिय निविष्ठा उपलब्ध करून देत आहेत. त्यांच्या या प्रयोगांमुळे परिसरातील अनेक शेतकरी प्रेरित झाले असून एकात्मिक शेती, मूल्यवर्धन आणि सेंद्रिय शेतीकडे वळू लागले आहेत. त्यांच्या शेताला नियमित अभ्यासभेटी आयोजित केल्या जात असून शेतकरी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विविध तंत्रज्ञानाची माहिती घेत आहेत. आज हरीश भाऊ काळे यांचे कार्य हे "**उत्पादनापासून प्रक्रिया आणि विपणनापर्यंत**" संपूर्ण कृषी मूल्यसाखळी उभारण्याचे प्रेरणादायी उदाहरण ठरत असून, त्यांच्या एकात्मिक शेती मॉडेलमुळे अनेक शेतकरी आत्मनिर्भर आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल करत आहेत.






4. **श्री बाबा कपिले, लासिना व श्री आशिष भाऊ गायके**, यवतमाळ येथील शेतकरी यांनी कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ यांच्या सहकार्यातून **लाकडी तेल घाणा** सुरू करून आपल्या भागातील तेलबिया पिकांचे क्षेत्र वाढवण्यात यश आले आहे.






5. **सुनील भाऊ घावडे** यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून रेशीम शेतीत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. **'रेशीम मित्र'** म्हणून ते परिसरातील शेतकऱ्यांना सातत्याने मार्गदर्शन करत असून रेशीम उद्योगाचा प्रभावी प्रसार करत आहेत. योग्य नियोजन, शास्त्रीय व्यवस्थापन आणि दर्जेदार रेशीम कोष उत्पादनाच्या माध्यमातून ते दरवर्षी सुमारे ४ ते ५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवत आहेत. त्यांच्या यशस्वी प्रयोगांमुळे अनेक शेतकरी रेशीम शेतीकडे आकर्षित झाले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेकांनी हा व्यवसाय सुरू करून उत्पन्नात वाढ केली आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत **दूरदर्शन ने त्यांच्या यशस्वी प्रवासाची मुलाखत प्रसारित** केली. या मुलाखतीद्वारे रेशीम शेतीतील त्यांचे अनुभव, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि आर्थिक यशाची कहाणी राज्यभरातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली. त्यामुळे अनेक इच्छुक शेतकऱ्यांना रेशीम शेतीकडे वळण्याची प्रेरणा मिळाली. आज सुनील भाऊ घावडे हे केवळ यशस्वी **रेशीम उत्पादक** नसून **रेशीम मित्र म्हणून ज्ञान, मार्गदर्शन आणि प्रेरणा देणारे आदर्श शेतकरी ठरले** आहेत. त्यांच्या कार्यामुळे रेशीम शेती हा ग्रामीण भागातील शाश्वत आणि फायदेशीर पूरक व्यवसाय म्हणून अधिक बळकट होत आहे.



6. **श्री कृष्णा भाऊ देशटीवार,** पांढरकवडा येथील शेतकरी १०० एकर प्रक्षेत्रावर **एकात्मिक शेती** पद्धतीचा यशस्वी प्रयोग करून इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करून प्रेरित करत आहेत.

   **त्याना महाराष्ट्र शासन यांचा २०२४ चा उद्यान पंडीत पुरस्कार जाहीर झाला आले.**





7. **श्री बंडू मोहूरले, वनी आणि श्री विकास शिरसागर, पांढरकवडा**, मधपाळ म्हणून यशस्वी **मधमाशी पालन** व्यवसाय करून जिल्ह्यामध्ये मधमाशी पालन व्यवसायास प्रोत्साहन देतअसून वर्षाकाठी चार ते पाच लाखाचे उत्पन्न मिळवत आहेत.
8. **श्री गजू अत्राम राहणार एकलारा ता.राळेगाव** यांनी मत्स्य शेतीमध्ये केज फार्मिंग हा नवीन उपक्रम सुरू करून जिल्ह्यामध्ये मत्स शेतीला चालना देण्यासाठी एक अभिनव उपक्रम चालू केला केज फार्मिंग ही मत्स्य शेती नवीन संकल्पना असून यामध्ये एकाच जगी माश्यांना जाळीमध्ये ठेवून त्यांना खाद्य पुरवठा करून त्याचा संगोपन केलं जाते त्यामुळे होणारा तो खर्च आहे तो कमी होऊन उत्पन्न चांगल्या प्रकारे मिळते.




शेतकरी शास्त्रज्ञ मंचामुळे तंत्रज्ञानाचा फार मोठ्या प्रमाणावर प्रसार झाल्याचे दिसून आले. मंचाचे सदस्य यांचा एकमेकांशी परिचय नव्हता त्या सर्वांचा मंचामुळे परिचय झाला हे सर्व शेतकरी एकत्र येऊन नवीन तंत्रज्ञान पाहण्यासाठी वेगवेगळया ठिकाणी सहल घेऊन जात व त्यांच्यामध्ये तंत्रज्ञानाबद्दल ओढ निर्माण झाली व यामधून प्रत्येकाने आपल्या कडे असलेल्या एका युनिटला दुसऱ्याची जोड दिली व त्यामधून त्यांची आर्थिक उन्नती झाली जसे निलेश टाके यांचे गांडूळ प्रकल्प पाहून जिल्ह्यामध्ये साधारणतः अंदाजे 25 शेतकऱ्यांनी स्वतःचे प्रकल्प सुरू केले. श्री गावडे यांचा तुतीचा प्रकल्प आदर्श गाव अहमदपूर येथील शेतकऱ्यांनी पाहून आदर्श गाव अहमदपूर येथे पाच रेशीम प्रकल्प सुरू झाले तसेच जिल्ह्यामध्ये देखील त्यांच्या रेशीम शेतीमुळे इतर शेतकऱ्यांना प्रेरणा भेटली. श्री अशोक वानखेडे यांच्या आधुनिक शेती पद्धतीचा अवलंब व त्यांच्याकडून होणाऱ्या शेती विषयावरील लिखाणामुळे इतर शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर प्रेरणा भेटून त्यांच्या शेतीमध्ये सुधारणा घडून आली. श्री माधवराव राऊत यांच्या प्रक्रिया उद्योग ज्यामध्ये डाळ निर्मिती होते ती पाहून महमदपूर येथे सुद्धा दाल मिल सुरू झाली तसेच इतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना फक्त कडधान्य न पिकवता त्याबद्दल प्रक्रिया करता येते याबद्दल आत्मविश्वास आला या व्यतिरिक्त इतर सन्माननीय शेतकरी

शास्त्रज्ञ मंचाचे सदस्य शेतकरी हे सुद्धा निरनिराळे प्रयोग करून शेतकरी वर्गामध्ये तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्र सार करीत आहेत.

## अभिप्राय

**9. शेतकरी शास्त्रज्ञ मंचातील सदस्यांचा अभिप्राय**

- शेतकरी शास्त्रज्ञ मंचात जिल्ह्यातील सर्व प्रगतशील शेतकरी असल्यामुळे त्यांचा अनुभव व मार्गदर्शन इतर शेतकऱ्यांना होतो
- मंचातील सदस्य हे आप आपल्या विषयात पारंगत असल्यामुळे ते इतर शेतकऱ्यांसाठी **light house** प्रमाणे दिशादर्शक ठरतात, त्यांचा अनुभव दुसऱ्या शेतकर्यांच्या कमी येतो
- मंचातील सर्व सदस्यांना वातावरणातील बदल यांचे व्यवस्थापन करण्यास विद्यापीठ व कृषी विज्ञान केंद्र यांच्या द्वारे होणारे मार्गदर्शन व कृषी सल्ला प्राप्त होतो
- विद्यापीठात निर्मित उत्पादने सहज रित्या प्राप्त होतात
- शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे सभासद असल्यामुळे जिल्ह्यातील इतर शेतकर्यापर्यंत पोहचता येते
- मंचाचे सभासद असल्यामुळे आपले उत्पादन योग्य भावात व जिल्ह्यात सहज रित्या पोहचवता येते.

**10. शेतकरी शास्त्रज्ञ मंचातील अध्यक्षाचे मनोगत – श्री. जगदीश चव्हाण**

मी मागील दोन वर्षापासून शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचा अध्यक्ष आहे आणि आम्ही प्रत्येक सभेस सर्व सदस्य एकत्र भेटतो आमच्या मज्जाच्या प्रत्येक सदस्याची एक शेतीमध्ये एक वेगळे योगदान आहे याप्रसंगी आम्ही प्रत्येकाकडे काय वेगळे आहे याची माहिती जाणून घेतो आणि त्याचे अनुकरण आम्ही करण्याचा प्रयत्न करतो तसेच मंचाचे सदस्य मिळून आम्ही नवीन शेतीमधील प्रयोग पाहण्यासाठी एकत्रित सहल काढतो व त्यामधून आम्हाला खूप शिकायला मिळते तसेच कृषी विज्ञान केंद्र आम्हा सदस्यांना अकोला येथे वेगवेगळया कार्यक्रमासाठी सुद्धा घेऊन जातात त्या ठिकाणी सुद्धा आम्हाला भरपूर शिकायला मिळते तसेच आमची मंज्याची सभा ज्या गावात आहे त्या गावांमधील शेतकऱ्यांचा आम्हाला अनुभव ऐकायला मिळतो व आम्ही एकमेकांमध्ये देवाणघेवाण करून शेती समृद्ध करत आहोत खरोखर या मंचामुळे जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्या जनजागृती होत आहे

**11. शेतकरी शास्त्रज्ञ मंचातील उपाध्यक्षाचे मनोगत – श्री. बाबा कपिले**

कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ अंतर्गत शेतकरी शास्त्रज्ञ मंचाची स्थापना झाली आहे. या मंचामध्ये जिल्ह्यातील प्रयोगशील शेतकरी व कृषी विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ महिन्यातून एकदा भेटून चर्चा करतात. शेतकऱ्यांच्या समस्या बाबत चर्चा करून त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करून त्यांचे उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न या मंचाचे माध्यमातून करण्यात येत आहे. कृषि विज्ञान केंद्राचे विविध विषयाचे तज्ञ शास्त्रज्ञ सतत मार्गदर्शन करण्यासाठी तत्पर असतात

विद्यापीठाच्या वतीने बियाण्याचे नवीन वाण शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्याचे कार्य कृषि विज्ञान केंद्राचे सर्व अधिकारी कर्मचारी करीत असतात. त्यामुळे कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख दीपक कच्छवे साहेब व त्यांचे सर्व कर्मचारी शास्त्रज्ञ हे धन्यवाद पात्र आहेत

**12. शेतकरी शास्त्रज्ञ मंचातील सदस्यांचा अभिप्राय** - श्री. निलेश टाके

"कृषी विज्ञान केंद्राच्या मार्गदर्शनामुळे मला अत्यंत कमी खर्चात गांडूळ खत निर्मिती प्रकल्प उभारता आला. सुरुवातीला हा प्रयोग छोट्या प्रमाणात सुरू केला होता; परंतु त्याचे सकारात्मक परिणाम पाहून आज मी नियमितपणे गांडूळ खताची निर्मिती करत आहे. शेतातील शेणखत, पीक अवशेष व इतर सेंद्रिय पदार्थांचा योग्य वापर करून दर्जेदार गांडूळ खत तयार होत आहे. या खताच्या वापरामुळे माझ्या जमिनीची सुपीकता वाढली असून रासायनिक खतांवरील खर्चात लक्षणीय बचत झाली आहे. पिकांची वाढ चांगली झाली, उत्पादनाच्या गुणवत्तेत सुधारणा झाली आणि उत्पादन खर्च कमी झाल्याने आर्थिकदृष्ट्याही फायदा झाला. माझ्या शेताला भेट देणाऱ्या शेतकरी बांधवांना मी गांडूळ खत निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया प्रत्यक्ष दाखवून मार्गदर्शन करतो. अनेक शेतकऱ्यांनी माझ्या अनुभवातून प्रेरणा घेऊन स्वतःच्या शेतावर गांडूळ खत निर्मिती युनिट सुरू केले आहे. कृषी विज्ञान केंद्राने दिलेल्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे सेंद्रिय शेतीचा आत्मविश्वास मिळाला असून, भविष्यातही सेंद्रिय शेतीचा विस्तार करून इतर शेतकऱ्यांनाही या तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित करणार आहे."

13. **शेतकरी शास्त्रज्ञ मंचातील सदस्यांचा अभिप्राय** - श्री. कृष्णा देशट्टीवार

"सन २०२३ मध्ये कृषी शास्त्रज्ञ मंच स्थापन करण्यात आला. मंचाच्या स्थापनेपासून दर महिन्याला नियमितपणे बैठक आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून आजतागायत त्या सातत्याने होत आहेत. या बैठकीमध्ये कृषी विज्ञान केंद्राच्या शास्त्रज्ञांकडून विविध पिकांतील आधुनिक तंत्रज्ञान, पीक व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, हवामान बदलानुसार शेती नियोजन तसेच विविध शासकीय योजनांविषयी सविस्तर मार्गदर्शन मिळते.

याशिवाय मंचातील सदस्य आपापले यशस्वी अनुभव, नाविन्यपूर्ण प्रयोग आणि शेतीतील अडचणी यांची देवाणघेवाण करतात. या अनुभवांच्या आदानप्रदानामुळे नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यास मदत झाली असून माझ्या शेतीमध्येही त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. कृषी विज्ञान केंद्राच्या तांत्रिक मार्गदर्शनामुळे माझ्या उत्पादनात वाढ झाली तसेच शेती अधिक शास्त्रीय पद्धतीने करण्याचा आत्मविश्वास मिळाला.

कृषी शास्त्रज्ञ मंचाच्या माध्यमातून आम्ही गावोगावी शेतकरी बैठका आयोजित करून कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी विभागाकडून मिळालेली माहिती इतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवत आहोत. त्यामुळे अनेक शेतकरी आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब करून लाभ घेत आहेत.

कृषी विज्ञान केंद्र व कृषी विभागाकडून वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि सहकार्यामुळे मला सन २०२३ मधील 'उद्यान पंडित' पुरस्कार मा. राज्यपाल यांच्या हस्ते प्राप्त झाला. हा सन्मान

मिळण्यात कृषी विज्ञान केंद्र व कृषी विभागाचे मोठे योगदान आहे. त्याबद्दल मी कृषी विज्ञान केंद्र, कृषी विभाग तसेच सर्व शास्त्रज्ञांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो."

14. **शेतकरी शास्त्रज्ञ मंचातील सदस्यांचा अभिप्राय** - श्री. सुनील विठ्ठल घावडे (रेशीम मित्र)

"कृषी विज्ञान केंद्राच्या सातत्यपूर्ण तांत्रिक मार्गदर्शनामुळे आणि रेशीम शेतीविषयक प्रशिक्षणामुळे मला आधुनिक पद्धतीने रेशीम उद्योग उभारण्याची प्रेरणा मिळाली. शास्त्रीय तंत्रज्ञानाचा अवलंब, तुती लागवडीचे योग्य व्यवस्थापन, अळी संगोपन आणि दर्जेदार रेशीम कोष उत्पादन यामुळे माझ्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे.

आज मी रेशीम शेतीतून दरवर्षी सुमारे ४ ते ५ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवत असून हा व्यवसाय माझ्यासाठी आर्थिकदृष्ट्या लाभदायक ठरला आहे. माझ्या यशामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी रेशीम शेतीकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्यास सुरुवात केली आहे. 'रेशीम मित्र' म्हणून मी इच्छुक शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन करून त्यांना हा व्यवसाय सुरू करण्यासाठी प्रोत्साहित करत आहे.

माझ्या कार्याची दखल घेऊन दूरदर्शनने माझ्या यशस्वी प्रवासाची मुलाखत प्रसारित केली, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे. यामुळे राज्यभरातील अनेक शेतकऱ्यांपर्यंत रेशीम शेतीचे महत्त्व आणि त्यातील संधी पोहोचल्या.

कृषी विज्ञान केंद्राच्या मोलाच्या सहकार्यामुळे मला आत्मविश्वास, तांत्रिक ज्ञान आणि आर्थिक प्रगतीची नवी दिशा मिळाली. भविष्यातही अधिकाधिक शेतकऱ्यांना रेशीम शेतीचा स्वीकार करण्यासाठी मार्गदर्शन करून ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती व शाश्वत शेतीला चालना देण्याचा माझा प्रयत्न राहील."

**निष्कर्ष :** कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ अंतर्गत स्थापन झालेला शेतकरी शास्त्रज्ञ मंच जिल्ह्यामधील उत्कृष्ट शेतकऱ्यांचा एक संघ झाला असून तो इतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी 'लाईट हाऊस' प्रमाणे काम करत आहे. Seeing is believing' या म्हणीनुसार "प्रत्यक्ष पाहिल्यावरच विश्वास बसतो" प्रमाणे स्वतः आपल्या जिल्यातील शेतकऱ्यांची यशोगाथा पाहून इतर शेतकरी प्रेरणा घेऊन त्यांच्या शेतीमध्ये त्याची अंमलबजावणी करताना दिसत आहेत. खरोखर तंत्रज्ञान प्रसार करण्याचा चांगला उपक्रम म्हणून शेतकरी शास्त्रज्ञ मंच वाटचाल करत आहे.



# शेतकरी शास्त्रज्ञ मंचच्या अध्यक्षपदी अशोक वानखेडे



**उमरखेड** : कृषी विज्ञान केंद्र यवतमाळच्या वतीने शेतकरी– शास्त्रज्ञ मंच समितीया समितीच्या अध्यक्षपदी भाऊसाहेब माने कृषी प्रतिष्ठानचे अध्यक्ष शेती मित्र अशोक वानखेडे तर उपाध्यक्षपदी गाजीपूर आर्णी येथील शेतकरी जगदीश चव्हाण यांची निवड करण्यात आली. यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या व शेतीच्या अडचणी व संशोधित तंत्रज्ञानाबाबत कृषी विद्यापीठास फीडबॅक देणे व शेतकऱ्यांच्या अडचणी कृषी विद्यापीठासमोर मांडून कृषी संशोधनास योग्य दिशा देण्याचे कार्य या समितीकडून होणार आहे. तसेच कृषी विद्यापीठाचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत प्रसार करण्याचे कार्य केले जाणार आहे. शेतीमित्र अशोक वानखेडे यांनी शेती आणि शेतकऱ्यांचा गाढा अभ्यास आहे. अशोक वानखेडे तसेच जगदीश चव्हाण यांच्या निवडीबद्दल कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, जिल्हाधिकारी अमोल येडगे, जिल्हा कृषी अधिकारी नवनाथ कोळपकर, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. नेमाडे,कृषी महाविद्यालय उमरखेडचे चेअरमन आणि यवतमाळ येथील अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. विजय माने तसेच भाऊसाहेब माने कृषी प्रतिष्ठानचे

# आधुनिक शेतीमध्ये यांत्रिकीकरण काळाची गरज – जिल्हाधिकारी

**यवतमाळ**

**सिंहझेप प्रतिनिधी**

कृषी विज्ञान केंद्राअंतर्गत उपलब्ध असलेले आधुनिक यांत्रिकी करणाचा वापर शेतक-यांनी शेतीमध्ये करावा. तसेच विद्यापीठाच्या शिफारशीत तंत्रज्ञानाची माहिती शेतकरी शात्रज्ञ मंचद्वारे जिल्ह्यातील शेतकऱ्यापर्यंत पोहचविण्याचे काम करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी केले. शेतकरी शात्रज्ञ मंच' सुरु करण्यात आला असुन याची दुसरी सभा ८ फेब्रुवारीला जगदीश चव्हाण, गाझीपुर, दारव्हा यांच्या ८प्रक्षेत्रावर घेण्यात आली.

'शेतकरी शात्रज्ञ मंच' च्यामाध्यमातून प्रचार आणि प्रसार करण्यात येणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी, अमोल येडगे यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी नवनाथ कोळपकर, वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा केंद्र प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, डॉ. सुरेश नेमाडे, जिल्हा रेशीम अधिकारी विलास शिंदे, महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक अशोकराव ठाकरे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक अमर गजभिये, दारव्हा तालुका कृषी अधिकारी एम. जे. थोरात, शेतकरी शास्त्रज्ञ मंचचे अध्यक्ष अशोकराव वानखडे, सुकळी, उपाध्यक्ष जगदीशभाऊ चव्हाण, गाझीपुर, शेतकरी मनीष जाधव, प्रगतशील शेतकरी, वागद-इजारा अमृतराव देशमुख, अंबोडा इत्यादी मान्यवर यांना आधुनिक शेतीची माहिती मिळावी व प्रयोगशील, पुरस्कृत व अनुभवी शेतकरी बांधवांनी अवगत केलेले तंत्रज्ञान व अनुभव हे इतर शेतकरी बांधवांनी सुद्धा अनुकरण करून त्यातुन उन्नती साधावी यासाठी शेतकरी शास्त्रज्ञ मंच सुरु केल्याची माहिती जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी दिली. कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ यांनी हा मंच सुरु केल्याबद्दल आणि त्यांच्या पुढील कार्याकरिता शुभेच्छा दिल्यात.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकमध्ये डॉ. सुरेश नेमाडे, शेतकरी शात्रज्ञ मंचाचे उद्देश व महत्त्व विषद केले. तसेच उपस्थित शेतकरी बांधवांना ड्रोन तंत्रज्ञानाचा शेती मध्ये वापर या विषयी प्रात्यक्षिक स्वरुपात सत्रामध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नवनाथ कोळपकर यांनी कृषी विभागामध्ये उपलब्ध असलेल्या कृषी विषयक योजनांविषयी उपस्थित शेतकरी बांधवांना माहिती दिली. जिल्हा रेशीम अधिकारी विलास शिंदे रेशीम उत्पादन विषयी सखोल मार्गदर्शन केले. जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक अमर गजबीये,यांनी शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या बँकेतील योजनांविषयी माहिती दिली. अशोकराव ठाकरे, जिल्हा व्यवस्थापक, महाबीज यांनी बीजउत्पादन कार्यक्रमाविषयी सखोल मार्गदर्शन केले. तालुका कृषी अधिकारी, दारव्हा एम. जे. थोरात यांनी शेतीला पूरक प्रक्रिया उद्योग या विषयी सखोल माहिती दिली. वागद-



जाधव यांनी कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञच्या संपर्कात राहून शेतीमध्ये शिफारशीत तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन उपस्थित शेतक-यांना केले. या प्रसंगी कृषी विज्ञान केंद्रातील डॉ. प्रमोद मगर, शास्त्रज्ञ, कीटकशास्त्र, गणेश काळूसे, शास्त्रज्ञ पशुसंवर्धन व सहायक, भरतसिंग सुलाणे, सहायक, उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन मयूर ढोले, तर आभार जगदीशभाऊ चव्हाण यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गाजीपूर येथील शेतकरी बांधव व शेतकरी शात्रज्ञ मंचाचे सर्व सदस्य


वैराग्यमूर्ती
मुख्य संपादक मयुर अशोकराव सवाईकर
मार्गदर्शक - नागेश उंबरकर
मो.न.८८०५००६०५१
भारत सरकार द्वारा पंजीकृत
RNI No- MAHMAR/2021/80724
अमरावती । रविवार
१६.०४.२०२३
संपादक - सतिश सावसकर


# पिकाची फेरपालट काळाची गरज. सुरेश नेमाडे
## वरिष्ठ शास्त्रज्ञ कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ

**राळेगाव तालुका प्रतिनिधी - रामभाऊ भोयर**

डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गत यवतमाळ जिल्ह्यासाठी कार्यरत असलेल्या कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ अंतर्गत स्थापन केलेल्या शेतकरी शास्त्रज्ञ मंच च्या तिसऱ्या सभेचे आयोजन डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचे स्मृती दिनानिमित्त दिनांक १० एप्रिल रोजी रिधोरा येथील प्रगतीशील शेतकरी हरिश काळे यांच्या प्रक्षेत्रावर संपन्न झाला . याप्रसंगी उद्यान पंडित पुरस्कार प्राप्त जगदीश चव्हाण गाझीपुर ( उपाध्यक्ष) शेतकरी शास्त्रज्ञ मंच, डॉक्टर सुरेश नेमाडे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा केंद्रप्रमुख कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ, अमोल जोशी उपविभागीय कृषी अधिकारी यवतमाळ, सरपंच उमेश गौऊळकार रिधोरा, नरेंद्र केवटे झाडगाव, तसेच कृषी विज्ञान केंद्राचे राहुल चव्हाण शास्त्रज्ञ, कृषी अभियांत्रिकी डॉक्टर प्रमोद मगर, शास्त्रज्ञ कीटकनाशक गणेश काळुसे, शास्त्रज्ञ पशुसंवर्धन व दुग्ध शास्त्र उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनपर जगदीश चव्हाण गाझीपुर शेतकरी शास्त्रज्ञ मंच उपाध्यक्ष यांनी विद्यापीठाचे विकसित व कमी खर्चिक तंत्रज्ञान आपल्या शेतावर कृषी विज्ञान केंद्राच्या संपर्कात राहून राबवावे, असे मत व्यक्त केले तर कार्यक्रमाच्या प्रास्ताविक पर मयूर लोंढे शास्त्रज्ञ विस्तार शिक्षण कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ यांनी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे उद्देश व महत्त्व विशद केले तर कार्यक्रमाचे आयोजक रिधोरा येथील प्रगतिशील शेतकरी हरीश काळे यांनी सर्व उपस्थित शेतकरी बांधवाचे स्वागत करून शेतीमध्ये करीत असलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल तसेच घेत असलेले उत्पादन व उत्पादनाबाबत मनोगत व्यक्त केले .तर याप्रसंगी राळेगाव तालुक्यातील प्रगतीशील व नाविन्यपूर्ण उपक्रम आपल्या शेतावर राबवित असलेल्या उपक्रमाविषयी या परिसरातील शेतकरी संदीप हांडे सफरचंद लागवड करते, सतीश जाधव मिरची लागवड करते, रुपेश कांडूरवार सिताफळ लागवड करते, सुमित राऊत कोरफड लागवड करते, सदानंद ठमके टरबूज, खरबूज, संत्रा, लागवड करते यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना सखोल माहिती दिली तसेच शेतकरी शास्त्रज्ञ मन च्या उपस्थित सदस्यानी आपल्या कार्याविषयी उपस्थित शेतकरी बांधवांना परिचय दिला



तसेच तांत्रिक सतरा मध्ये डॉक्टर सुरेश नेमाडे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा केंद्रप्रमुख कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ, यांनी पारंपारिक पीक पद्धतीमध्ये पिकाची फेरपालटीचे महत्व तसेच फळबाग व्यवस्थापन याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तर डॉक्टर प्रमोद मगर शास्त्रज्ञ कीटकनाशक कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ यांनी फळबागेतील कीड व रोग या व्यवस्थापन याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तर राहुल चव्हाण शास्त्रज्ञ कृषी अभियांत्रिक कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ यांनी आधुनिक कृषी अवजारे याविषयी सखोल मार्गदर्शन केले. तर गणेश काळुसे शास्त्रज्ञ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ यांनी शेळीपालन व कुक्कुटपालन याविषयी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या प्रक्षेत्र भेटीमध्ये हरीश काळे यांनी आपल्या शेतीमध्ये राबवित असलेल्या शेळीपालन कुक्कुटपालन मधुमक्षिका पालन व लागवड केलेल्या केळी, ऊस प्रक्षेत्रास भेटी दिल्या सदर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्योजक शेतकरी गजानन आत्राम एक लारा, यांनी केले तर या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन हरीश काळे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता रिधोरा गावातील शेतकरी बांधव व शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे सर्व सदस्य व भरत सिंग सुलाने सहाय्य, अमोल कडू यांनी सहकार्य केले


देशोन्नती


# रिधोरा येथे शेतकरी शास्त्रज्ञ मंचची सभा

देशोन्नती वृत्तसंकलन...




**रिधोरा** ■ कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ अंतर्गत स्थापन केलेल्या शेतकरी शास्त्रज्ञ मंच च्या तिसऱ्या सभेचे आयोजन डॉक्टर पंजाबराव देशमुख यांचे स्मृती दिनानिमित्त१० एप्रिल रोजी रिधोरा येथील प्रगतीशील शेतकरी हरिश काळे यांच्या प्रक्षेत्रावर करण्यात आले होते. याप्रसंगी उद्यान पडित पुरस्कार प्राप्त जगदीश चव्हाण गाझीपुर ( उपाध्यक्ष) शेतकरी शास्त्रज्ञ मंच, डॉ. सुरेश नेमाडे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा केंद्रप्रमुख कृषी विज्ञान केंद्र यवतमाळ, अमोल जोशी उपविभागीय कृषी अधिकारी यवतमाळ, सरपंच उमेश गौऊळकार रिधोरा, नरेंद्र केवटे झाडगाव, तसेच कृषी विज्ञान केंद्राचे राहुल चव्हाण शास्त्रज्ञ, कृषी अभियांत्रिकी डॉक्टर प्रमोद मगर, शास्त्रज्ञ कीटकनाशक गणेश काळुसे, शास्त्रज्ञ पशुसंवर्धन व दुग्ध शास्त्र उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मार्गदर्शनपर जगदीश चव्हाण गाझीपुर शेतकरी शास्त्रज्ञ मंच उपाध्यक्ष यांनी विद्यापीठाचे विकसित व कमी खर्चिक तंत्रज्ञान आपल्या शेतावर कृषी विज्ञान केंद्राच्या संपर्कात राहून राबवावे. असे मत व्यक्त केले या परिसरातील शेतकरी संदीप हांडे , सतीश जाधव , रुपेश कांदूरवार , सुमित राऊत , सदानंद ठमके यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना सखोल माहिती दिली. (**वार्ता.**)


Yavatmal Edition
Apr 15, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com



दैनिक लोकसूत्र
किंमत 3 रु E-mail: Loksutra@gmail.com RNI NO. MAHMAR/2022/83119


# मत्स्य व्यवसायातून शेतीला चालणा मिळेल!

- केव्हीकेचे शास्त्रज्ञ सुरेश नेमाडेंचा सल्ला
- एकलाऱ्यात राष्ट्रीय मत्स्य दिवस

**लोकसूत्र प्रतिनिधी**



यवतमाळ : महिला गटांमार्फत अनेक कृषी संलग्न उद्योग सुरू करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनाही शेतीचे उत्पन्न वाढवायचे असेल तर काही पुरक व्यवसाय सुरु करावे लागतील. मत्स्य व्यवसायातूनही शेतीला चांगली चालणा मिळेल, असे प्रतिपादन अकोल्यातील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाशी संलग्न यवतमाळातील कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ सुरेश नेमाडे यांनी केले. ते १० जुलै रोजी एकलारा येथे राष्ट्रीय मत्स्य दिवसाच्या निमित्त आयोजित एका कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्यान पंडीत पुरस्कार प्राप्त शेतकरी जगदीश चव्हाण होते. तर प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुरेश नेमाडे, मत्स्य व्यवसायाचे सहाय्यक आयुक्त अजय मेसरे, उमेदचे धनवंद शेंडे, मिलींद चोपडे, केव्हीकेचे विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ मयूर ढोले, कीटकशास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मगर आदी उपस्थित होते. यावेळी चव्हाण यांनी शेतकरी शास्त्रज्ञ मंचाच्या पाचव्या सभेच्या आयोजनाबद्दल आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले की, महिला गटांमार्फत प्रक्रिया उद्योगांना चालना द्यावी लागेल. त्यासाठी कृषी विज्ञान केंद्रासोबत शेतकऱ्यांनी संपर्क करायला हवा. शेतकरी वर्गाने आता पुढे येण्याची गरज असल्याचे ते म्हणाले. मयूर ढोले यांनी आपल्या प्रास्ताविकातून शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचा उद्देश व्यक्त केला. उमेदच्या कृषी सखी माया पाझरे व राळेगावच्या ज्योत्स्ना गेडाम यांनी आपले अनुभव कथन केले. मत्स्य व्यवसायातील प्रगतशिल शेतकरी गजू आत्राम यांनी शेतकऱ्यांचे स्वागत करून आपले अनुभव कथन केले. त्याचबरोबर शेतावर राबविलेल्या नाविण्यपूर्ण उपक्रमाबाबत पांढरकवड्याचे कृष्णा देशट्टीवार, रिधोऱ्याचे हरीष काळे यांनी सखोल माहिती दिली. तांत्रिक सत्रामध्ये डॉ. नेमाडे यांनी शेतातील उत्पादन व उत्पन्न वाढविण्यासाठी विद्यापीठाच्या विकसीत तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहन केले. तसेच आर्थिक उत्पन्न करीता शेतीला पुरक व्यवसायाची सांगड घालावी, या विषयी मार्गदर्शन केले. मेसरे यांनी मत्स्य दिवसाचे महत्व सांगुन आपल्या विभागाच्या योजनांची माहिती दिली. तर डॉ. मगर यांनी बचत गटाच्या आर्थिक उत्पन्न वाढीसाठी पिवळे चिकट सापळे, दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क या व्यवसायाबद्दल मार्गदर्शन केले. उमेदचे धनवंद शेंडे यांनी शासकीय विमा योजना तर चोपडे यांनी प्रक्रिया उद्योगाबद्दल माहिती दिली. संचालन प्राजक्ता गेडाम यांनी तर आभार ललिता ससाणे यांनी मानले. कार्यक्रमासाठी एकलारा येथील नवनिर्माण महिला ग्रामसंघाच्या पदाधिकारी व शेतकऱ्यांनी श्रम घेतले.